**आजचे पंचांग**

गुरुवार, दि. ५ मार्च २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत २०८२, विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, फाल्गुन मास, कृष्णपक्ष, द्वितीया संध्याकाळी ५-०४ पर्यंत, दिवस नक्षत्र- उत्तराफाल्गुनी सकाळी ८-१८ पर्यंत, योग- शूल सकाळी ७-४६, चंद्र रास- कन्या, सूर्य रास = कुंभ, गुरु रास= मिथुन

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


**उजनीतून विसर्ग बंद**

**पुणे**: उजनी धरण येथून भीमा नदीपात्रामध्ये पिण्याच्या पाणी योजनांसाठी सांडव्यातून तसेच विद्युत निर्मितीगृहातून सोडण्यात येणारा पाणीविसर्ग पूर्णपणे बंद करण्यात आला आहे. सध्या धरणामध्ये ६३.०१ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. धरणातून २० फेब्रुवारीपासून भीमा नदीपात्रात नळ पाणीपुरवठा योजनांसाठी सांडवा आणि पॉवरहाऊसच्या माध्यमातून पाणी सोडण्यात आले होते. हा विसर्ग ५ हजार क्युसेकपर्यंत नेण्यात आला होता.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | गुरुवार, दि. ५ मार्च, २०२६ | वर्ष - १ | अंक - १६० | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### पश्चिम बंगालमध्ये होळी उत्साहात

**कोलकाता :** पश्चिम बंगालमधील लोकांनी बुधवारी होळी साजरी करताना एकमेकांना 'गुलाल' लावला आणि रंग फवारले, डोलजत्रेनंतर दुसऱ्या दिवशीही उत्सव सुरूच होता. हा उत्सव सकाळी उशिरा सुरू झाला, लोकप्रिय बॉलीवूड होळी गाण्यांच्या गजरात लोकांचे गट उत्सवात सामील झाले. वेगवेगळ्या ठिकाणी सर्व वयोगटातील लोक नृत्य करत होते, या कार्यक्रमात मैत्री आणि सौहार्दपूर्ण वातावरण होते.

### रशियन तेल आयातीत वाढ होणार

**मॉस्को :** पश्चिम आशियातील सुरू असलेल्या युद्धामुळे भारताची रशियन कच्च्या तेलाची मागणी वाढू शकते आणि २०२४-२०२५ मध्ये ती दररोज १.५ दशलक्ष बॅरलच्या पातळीला स्पर्श करू शकते, असे जागतिक तेल व्यापारातील एका आघाडीच्या तज्ज्ञाने म्हटले आहे. उपपंतप्रधान अलेक्झांडर नोवाक यांनी सांगितले होते की रशियाला पुढील शुद्धीकरणासाठी भारतातून तेलाची मागणी वाढत असल्याचे दिसून येत आहे. मॅक्सिम मालकोव्ह यांनी सांगितले की, पश्चिम आशिया युद्धामुळे भारताची रशियाकडून तेल आयात वाढेल.

### अर्ज दाखल करताना नाव होणार जाहीर


**शिमला :** राज्यसभेच्या एकमेव जागेसाठी काँग्रेसच्या उमेदवाराचे नाव गुरुवारी उमेदवारी अर्ज दाखल करताना जाहीर केले जाईल, असे मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखू यांनी बुधवारी सांगितले. होळीनिमित्त येथे माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी सांगितले की, उमेदवार हिमाचल प्रदेशचा असेल. राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख ५ मार्च आहे आणि मतदान १६ मार्च रोजी होणार आहे.

---

**काँग्रेसकडून अधिकृतपणे पाठिंबा; राज्यसभेसाठी ज्येष्ठत्वाचा विचार**

# शरद पवारच मविआचे उमेदवार!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** राज्यसभा निवडणुकीसाठी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या उमेदवारीवर अखेर शिक्कामोर्तब झाले असून महाविकास आघाडीकडून त्यांना अधिकृत पाठिंबा जाहीर करण्यात आला आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी पत्रकार परिषदेत ही घोषणा केली.

दरम्यान, पवार यांचे नातू पार्थ पवार हे देखील राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची घोषणा यापूर्वीच करण्यात आली आहे. त्यामुळे पवार आजोबा आणि नातू एकाच वेळी राज्यसभेत असण्याची शक्यता व्यक्त होत आहे. पवार यांच्या उमेदवारीमुळे निवडणूक बिनविरोध होण्याचीही शक्यता वर्तवली जात आहे. राज्यसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत ६ मार्च असल्याने महाविकास आघाडीकडून उमेदवार कोण, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. काँग्रेस आणि उबाठा या दोन्ही पक्षांकडून संबंधित जागेवर दावा करण्यात येत होता. मात्र, ज्येष्ठत्व आणि संसदीय अनुभवाचा विचार करून पवार यांच्या नावावर एकमत झाले.

दरम्यान, अर्ज भरण्यासाठी स्वतः पवार उपस्थित राहण्याची शक्यता कमी असून विधिमंडळातील अधिकारी 'सिल्व्हर ओक' या निवासस्थानी जाऊन प्रक्रिया पूर्ण करतील, अशी माहिती सूत्रांनी दिली. शिवसेना नेते संजय राऊत यांनीही सामाजिक माध्यमांवर प्रतिक्रिया देत महाविकास आघाडी एकसंध राहील, असे स्पष्ट केले.

राज्यातील राज्यसभा जागांवरून गेल्या काही दिवसांपासून आघाडीत रस्सीखेच सुरू होती. काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी संबंधित जागेवर काँग्रेसचा नैसर्गिक दावा असल्याचे म्हटले होते. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)कडून दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांशी तसेच उद्धव ठाकरे यांच्याशी सातत्याने संपर्क ठेवण्यात आला. अखेरीस काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पुढाकार घेत पवार यांच्या उमेदवारीला हिरवा कंदील दिल्याची माहिती आहे.

दुसरीकडे भारतीय जनता पक्षने चार उमेदवारांची घोषणा केली आहे. पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांना उमेदवारी देण्यात आली असून रिपब्लिकन पक्षचे नेते रामदास आठवले यांना पुन्हा संधी देण्यात आली आहे. तसेच नागपूरच्या माजी महापौर माया ईवनाते आणि धनगर समाजाचे नेते रामराव वडकुते यांनाही उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचा एक उमेदवारही अर्ज दाखल करणार आहे.

महाराष्ट्रातील सात राज्यसभा जागांसाठी ही निवडणूक होत असून १६ मार्च रोजी मतदान होणार आहे. विद्यमान संख्याबळ लक्षात घेता महाविकास आघाडीस किमान एक जागा निश्चित मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

---

# विनोद तावडे यांना राज्यसभेसाठी उमेदवारी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** भारतीय जनता पक्षने २०२६ च्या राज्यसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातून विनोद तावडे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. उमेदवारी जाहीर होताच तावडे यांनी सामाजिक माध्यमांवर प्रतिक्रिया देत पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीचे आणि वरिष्ठ नेतृत्वाचे आभार मानले.

तावडे यांनी आपल्या संदेशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांच्या नेतृत्वाखाली देशहितासाठी कार्यरत राहण्याची बांधिलकी व्यक्त केली. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचेही त्यांनी विशेष आभार मानले.

तावडे यांना मिळालेली उमेदवारी ही त्यांच्या संघटनात्मक कौशल्याची आणि पक्षनिष्ठेची पावती मानली जात आहे. विशेषतः बिहारमधील त्यांच्या कामगिरीचा या निर्णयात मोठा वाटा असल्याचे मानले जाते. २०२२ मध्ये नितीश कुमार यांनी एनडीएची साथ सोडल्यानंतर बिहारची जबाबदारी तावडे यांच्याकडे सोपवण्यात आली होती. त्यांनी बूथ स्तरापर्यंत संघटना बळकट करण्यावर भर दिला. कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करत सूक्ष्म नियोजनाद्वारे त्यांनी पक्षाची पकड मजबूत केली. २०२५ च्या बिहार विधानसभा निवडणुकीत एनडीएला मिळालेल्या यशामागे त्यांची रणनीती महत्त्वाची ठरल्याचे मत आहे.

---

# पुण्यात विनापरवाना गुंगीकारक औषधांची विक्री

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे शहरात डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय गुंगीकारक औषधांची बेकायदेशीर विक्री होत असल्याचा गंभीर खुलासा राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी केला. विधानमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात त्यांनी ही माहिती दिली.

या संदर्भात आमदार चित्रा वाघ यांनी प्रश्न उपस्थित केला होता, तर आमदार अभिजीत वंजारी यांनी उपप्रश्न विचारला. त्याला उत्तर देताना कदम यांनी सांगितले की, पुण्यात काही जण विनापरवाना आणि वैद्यकीय सल्ल्याशिवाय गुंगीकारक औषधे नशेसाठी विकत असल्याचे उघड झाले आहे. अशा औषधांचा साठा बाळगल्याप्रकरणी संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कदम यांच्या माहितीनुसार, या प्रकरणात पाच जणांवर आरोप निश्चित करण्यात आले असून त्यापैकी दोघांना अटक करण्यात आली आहे. उर्वरित तिघांचा शोध सुरू आहे. सर्व आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. जप्त करण्यात आलेली औषधे प्रमाणित असली तरी ती कोणत्याही स्थानिक मेडिकल स्टोअरमधून खरेदी करण्यात आलेली नसल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. संबंधित औषधांचा पुरवठा बाहेरच्या राज्यातून झाल्याची माहिती पुढे आली आहे.

औषध पुरवठा साखळीचा तपास सुरू असून, पुणे शहरात बनावट नशेची औषधे तयार करणारी कोणतीही कंपनी आढळून आलेली नाही, असेही कदम यांनी स्पष्ट केले.

---

**बोगस दिव्यांग प्रमाणपत्र प्रकरणी मोठी कारवाई**

# ३१६ अधिकारी-कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मुंबई :** बनावट दिव्यांग प्रमाणपत्र सादर करून शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या ३१६ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर राज्य सरकारने निलंबनाची कारवाई केली आहे. ४० टक्क्यांहून कमी दिव्यांगत्व असतानाही सवलती घेतल्याचे आढळून आल्याने ही कारवाई करण्यात आल्याची माहिती मंत्री अतुल सावे यांनी दिली.

या संदर्भात भाजपचे आमदार श्रीकांत भारतीय यांनी लेखी प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर दिलेल्या उत्तरात सावे यांनी स्पष्ट केले की राज्यातील २८ जिल्हा परिषदांमधील पडताळणीत प्रमाणपत्र नसलेले, बनावट प्रमाणपत्र सादर केलेले किंवा ४० टक्क्यांपेक्षा कमी दिव्यांगत्व असलेले एकूण ३१६ अधिकारी आणि कर्मचारी आढळून आले आहेत. त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

अंतरिम अहवालानुसार, २८ जिल्हा परिषदांमध्ये एकूण १० हजार ९२२ दिव्यांग अधिकारी-कर्मचाऱ्यांची नोंद आहे. त्यापैकी ६ हजार २१८ जणांची पडताळणी पूर्ण झाली असून उर्वरित सुमारे पाच हजार जणांची तपासणी प्रलंबित आहे. त्यामुळे पुढील काळात आणखी कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, दिव्यांग कल्याण विभागाने या प्रकरणी व्यापक मोहीम हाती घेतली आहे. विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी राज्यातील सर्व ३४ जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना लेखी आदेश देत दिव्यांग प्रमाणपत्रांची सखोल पडताळणी करण्याचे निर्देश दिले आहेत. शिक्षण, आरोग्य, बांधकाम आदी सर्व विभागांतील अधिकारी, कर्मचारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा या तपासात समावेश करण्यात येणार आहे.

१८ सप्टेंबर २०२५ रोजी सर्व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना आदेश पाठवण्यात आल्यानंतर जिल्हा परिषद स्तरावर पडताळणी प्रक्रिया सुरू झाली आहे. शासनाच्या विविध योजनांतील सवलती दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे दिल्या जात असल्याने या कारवाईमुळे बोगस प्रमाणपत्र सादर करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांची जबाबदारीही निश्चित केली जाणार असल्याचे संकेत आहेत.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या कलम ९१ नुसार, बनावट दिव्यांग प्रमाणपत्र आढळल्यास संबंधित व्यक्तीस दोन वर्षांपर्यंत कारावास किंवा एक लाख रुपयांपर्यंत दंड, अथवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. राज्य सरकारच्या या कारवाईमुळे प्रशासनात खळबळ उडाली आहे.

---

# मुळशी, जुन्नर, भोरमध्ये समीकरणे गुंतागुंतीची
# पंचायत समिती सभापती निवडीत चुरस

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** जिल्ह्यातील काही पंचायत समित्यांमध्ये स्पष्ट बहुमत नसल्याने सभापती व उपसभापती निवडीसाठी राजकीय चुरस वाढली आहे. मुळशी, जुन्नर आणि भोर पंचायत समित्यांमध्ये आघाड्यांचे गणित निर्णायक ठरणार आहे. सोमवारी (ता. ९) सभापती व उपसभापती पदांसाठी निवडणूक होणार असून, त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून उपजिल्हाधिकाऱ्यांची पीठासीन अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील तेरा पंचायत समित्यांमध्ये निवडीसाठी अवघे काही दिवस उरले असून तालुकानिहाय राजकीय हालचालींना वेग आला आहे. निवडून आलेले सदस्य आपापली मोर्चेबांधणी करत आहेत. प्रमुख पक्षांकडून तालुकास्तरीय बैठका घेऊन नवनिर्वाचित सदस्यांशी चर्चा सुरू आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिलीप वळसे पाटील यांनी पुण्यातील बैठकीत नवनिर्वाचित सदस्यांना मार्गदर्शन करत जास्तीत जास्त पंचायत समित्यांमध्ये पक्षाचा सभापती निवडून आणण्यासाठी सक्रिय राहण्याचे आवाहन केले.

जुन्नर पंचायत समितीत भाजपचा एक, राष्ट्रवादी काँग्रेसचे सहा, शिवसेनेचे आठ आणि उबाठाचा एक असे एकूण १६ सदस्य आहेत. येथे कोणत्याही एका पक्षाकडे स्पष्ट बहुमत नसल्याने आघाडीचा पर्याय महत्त्वाचा ठरणार आहे.

भोरमध्ये भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस प्रत्येकी चार सदस्यांसह समसमान स्थितीत आहेत. त्यामुळे सभापती निवडीत प्रत्येक मत निर्णायक ठरणार आहे. मुळशीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे तीन, भाजपचा एक आणि शरद पवार गटाचे दोन सदस्य निवडून आले आहेत.

आठ पंचायत समित्यांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व दिसून येत आहे. मावळ आणि बारामती येथे प्रत्येकी १० सदस्य, इंदापूरमध्ये १६ सदस्य, राजगडमध्ये ३ सदस्य, आंबेगाव आणि शिरूर येथे प्रत्येकी ८ सदस्य, पुरंदरमध्ये ४ सदस्य, तर हवेलीमध्ये ६ सदस्य निवडून आले आहेत. दौंड पंचायत समितीत भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. तर खेडमध्ये उबाठाने १६ पैकी ९ जागा जिंकत वर्चस्व सिद्ध केले आहे.

---

### 'लात साहेब' मिरवणूक शांततेत

**शहाजहानपूर (उत्तर प्रदेश) :** होळीनिमित्त येथे पारंपारिक 'लातसाहेब' मिरवणूक बुधवारी कडक सुरक्षेत काढण्यात आली, ज्यात उत्साही लोकांनी घोषणाबाजी केली आणि रीतिरिवाजांचा भाग म्हणून 'लाटसाहेब' यांना प्रतीकात्मकपणे जोडे मारले. शाहजहांपूरमधील ही मिरवणूक शतकानुशतके जुनी होळी परंपरा आहे जिथे एका अधिकाऱ्याचे प्रतिनिधित्व करणारा माणूस, वसाहतकालीन ब्रिटिश अधिकारी ('लात साहब') बैलगाडीवरून शहरातून मिरवला जातो, तेव्हा आनंदोत्सव करणारे घोषणाबाजी करतात आणि दुष्कर्माचे प्रतीकात्मक कृत्य म्हणून त्याला जोड्यांनी मारतात.

---

# 'रामेश्वरम कॅफे'वर पालिकेची कारवाई

**सार्वजनिक जागेचा वापर केल्याची तक्रार**

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** विमाननगर परिसरातील प्रसिद्ध रामेश्वरम कॅफेवर पुणे महानगरपालिकेने अतिक्रमणविरोधी कारवाई केली आहे. दुकानाबाहेरील सार्वजनिक जागेचा वापर आणि अतिक्रमण केल्याच्या तक्रारीनंतर ही कारवाई करण्यात आली.

बेंगळुरूमध्ये लोकप्रिय असलेले हे कॅफे डिसेंबर २०२५ मध्ये पुण्यात सुरू झाले होते. दक्षिण भारतीय पारंपरिक खाद्यपदार्थांसाठी ओळख असलेल्या या कॅफेला सुरुवातीपासूनच मोठा प्रतिसाद मिळाला. सकाळपासून रात्रीपर्यंत ग्राहकांच्या लांबच लांब रांगा लागत असल्याचे चित्र येथे पाहायला मिळत होते. स्थानिक नागरिकांकडून कॅफे बाहेरील सार्वजनिक जागेचा वापर होत असल्याची तक्रार करण्यात आली होती. त्यानुसार पुणे महानगरपालिकाच्या पथकाने पाहणी केली. त्यावेळी नियमांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर संबंधित अतिक्रमण हटवण्यात आले. हे कॅफे तुपात बनवलेले खुसखुशीत डोसे, मऊ इडली आणि पारंपरिक फिल्टर कॉफीसाठी ओळखले जाते. त्यामुळे अनेक खाद्यप्रेमी खास या ठिकाणी भेट देत असल्याचे दिसून आले.

या कॅफेची स्थापना राघवेंद्र राव आणि दिव्या राघवेंद्र राव यांनी केली असून दक्षिण भारतीय खाद्यसंस्कृतीचा अस्सल स्वाद व्यापक स्तरावर पोहोचवणे हा त्यांचा उद्देश असल्याचे अधिकृत संकेतस्थळावर नमूद आहे.

---

**सहा लाख टन तांदूळ अडकला, हजारो कोटी अडचणीत**

# इराणच्या होर्मुझ बंदीचा बासमती निर्यातीवर फटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** इराण-इस्रायल संघर्ष तीव्र झाल्यानंतर इराणने होर्मुझची सामुद्रधुनी बंद केल्याची घोषणा केल्याने जागतिक सागरी व्यापारावर मोठा परिणाम झाला आहे. या मार्गाने कच्चे तेल आणि वायूचा मोठ्या प्रमाणावर पुरवठा होतो; त्याचबरोबर भारतातून आखाती देशांकडे जाणाऱ्या बासमती तांदळाच्या निर्यातीवरही त्याचा थेट फटका बसला आहे.

ऑल इंडिया राईस एक्सपोर्टर्स असोसिएशनचे माजी अध्यक्ष विजय सेतिया यांनी सांगितले की भारतातून आखाती देशांकडे पाठविल्या जाणाऱ्या तांदळाचा एकूण ट्रान्झिट कालावधी सुमारे ४० दिवसांचा असतो. यात भारतीय बंदरांवरील प्रक्रिया, समुद्री प्रवास आणि गंतव्य देशांच्या बंदरांवरील विलंब यांचा समावेश असतो. सध्याच्या परिस्थितीत तांदळाची नवीन निर्यात थांबवण्यात आली असून काही दिवसांपूर्वी पाठविलेला जवळपास सहा लाख टन बासमती तांदूळ विविध बंदरांवर आणि समुद्रात अडकून पडला आहे.

या अडकलेल्या मालाची किंमत अंदाजे पाच ते सहा हजार कोटी रुपये इतकी असल्याचे सेतिया यांनी नमूद केले. विविध बंदरांवर आणि समुद्रात भारतीय बासमती तांदळाच्या कन्साइनमेंट अडकल्या असल्याने निर्यातदारांनी नव्या पाठवणीचे पॅकिंग तात्पुरते स्थगित केले आहे. परिस्थिती सामान्य झाल्यानंतरच निर्यात पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला जाईल.

भारत दरवर्षी सुमारे ६० लाख टन बासमती तांदूळ निर्यात करतो, त्यापैकी जवळपास ७० टक्के निर्यात आखाती देशांकडे होते. म्हणजेच दरवर्षी सुमारे ४५ लाख टन बासमती तांदूळ या प्रदेशात जातो. इराण हा भारतासाठी महत्त्वाचा बाजार असून काही वर्षांत तेथे १४ लाख टनांपर्यंत निर्यातीची नोंद झाली आहे.

असोसिएशनच्या माहितीनुसार, आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये भारताने एकूण ६०.६५ लाख टन बासमती तांदूळ निर्यात केला असून त्याची किंमत सुमारे ५०,३१२ कोटी रुपये होती. त्याच वर्षात देशातील एकूण तांदूळ उत्पादन १५.०१ कोटी टन होते, त्यातील बासमती उत्पादन सुमारे ७० ते ७५ लाख टनांच्या दरम्यान होते. चालू आर्थिक वर्षात एप्रिल ते डिसेंबर दरम्यान आखाती देशांकडे ३२ लाख टनांहून अधिक बासमती तांदूळ निर्यात करण्यात आला आहे.

सेतिया यांच्या मते, जर संघर्ष दीर्घकाळ चालला आणि सागरी मार्गावरील अडथळे कायम राहिले, तर त्याचा परिणाम देशांतर्गत बासमती तांदळाच्या दरांवर होऊ शकतो. निर्यात ठप्प राहिल्यास बाजारात पुरवठा वाढून दर घसरण्याची शक्यता आहे.

सध्या निर्यातदार 'वेट अँड वॉच'च्या भूमिकेत असून परिस्थिती सुधारण्याची प्रतीक्षा करत आहेत.

---

# शासकीय वाहनांसाठी इंधन राखीव ठेवण्याचे आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जालना :** संभाव्य इंधन तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यातील सर्व पेट्रोलपंप चालकांना शासकीय आणि अत्यावश्यक सेवेच्या वाहनांसाठी पेट्रोल व डिझेलचा साठा राखीव ठेवण्याचे आदेश जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी दिले आहेत.

इराण-इस्रायल युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधन पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्ह्यातील शासकीय कामकाज आणि आपत्कालीन सेवा सुरळीत राहाव्यात, यासाठी आवश्यक त्या प्रमाणात इंधन राखून ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच, कोणत्याही पेट्रोलपंपावर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी तहसीलदारांनी दक्षता घ्यावी, असे निर्देशही पुरवठा विभागाकडून देण्यात आले आहेत. अफवांमुळे नागरिकांनी एकाच वेळी मोठ्या प्रमाणात इंधन खरेदी करण्याचा प्रयत्न केल्यास परिस्थिती हाताबाहेर जाऊ शकते, याची प्रशासनाने दखल घेतली आहे.

दरम्यान, बीड जिल्ह्यात इंधन तुटवड्याबाबत अफवा पसरल्याने काही पेट्रोलपंपांवर वाहनचालकांनी गर्दी केली होती. मात्र जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्पष्ट केले की जिल्ह्यात इंधनाची कोणतीही कमतरता नाही. पेट्रोल पुरवठा कंपन्यांसोबत बैठक घेण्यात आली असून जिल्ह्यात मुबलक साठा उपलब्ध आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन त्यांनी केले आहे.

## संपादकीय

### भारतासमोरील ऊर्जा सुरक्षा संकट तीव्र



**पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षामुळे भारताच्या ऊर्जा पुरवठ्यावर मोठा दबाव आहे. होर्मुझ सामुद्रधुनीवरील टँकर वाहतूक थांबल्याने ब्रेंट क्रूड तेल युद्धपूर्व ६५ प्रति बॅरलच्या पातळीपेक्षा १० डॉलर जास्त झाले आहेत. याचा परिणाम घरगुती अर्थव्यवस्था, व्यापार संतुलन आणि रुपयावर थेट पडत आहे.**

पश्चिम आशियामध्ये इराणपासून गल्फ कोऑपरेशन कौन्सिल देशांपर्यंत पसरलेला संघर्ष भारतासाठी फक्त दूरदर्शी राजनैतिक प्रश्न नाही; तो आपल्या दैनंदिन जीवनावर, उद्योगावर आणि आर्थिक निर्णयांवर थेट परिणाम करत आहे. पर्शियन आखातातील होर्मुझ सामुद्रधुनी जगातील तेल आणि वायूच्या वाहतुकीचा जवळजवळ पाचवा भाग वाहतो. ही एकमेव शिपिंग कॉरिडॉर असल्यामुळे, या मार्गावर वाहतूक थांबली की तेल दरात झपाट्याने वाढ होते, घरगुती खर्चाला ताण येतो, उद्योगांचा उत्पादन खर्च वाढतो आणि चालू खाती असंतुलित होतात. भारताच्या सरासरी तेल आयातीतून दररोज ४ दशलक्ष बॅरल म्हणजे सुमारे ५५ टक्के हा मार्गाने येतो. कच्च्या तेलाच्या प्रति बॅरल किमतीत होणारी प्रत्येक १ डॉलरची वाढ आपल्या वार्षिक तेल आयात बिलात सुमारे २ अब्जची भर घालते. २०२४–२५ मध्ये हा आकडा १३७ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचला आहे. संघर्ष पुढे वाढला, तर व्यापार संतुलन बिघडेल, रुपयावर दबाव येईल, आणि घरगुती अर्थव्यवस्थेला मोठा ताण येईल. परिस्थिती आणखी गंभीर आहे कारण आपला साठा फक्त ४०–४५ दिवसांसाठी पुरतो, तर चीनमध्ये ६ महिन्यांचा साठा तयार केलेला असतो. ही समस्या फक्त आर्थिक नाही; मानवी जीवनावरही त्याचा थेट परिणाम आहे. दुबई, दोहा, मनामा आणि कुवेतमध्ये पसरलेल्या आगीत अनेक लोकांचा जीव गमावला आहे. अमेरिकन लष्करी प्रतिष्ठान आणि जीसीसीच्या तेल मालमत्तेला लक्ष्य करणाऱ्या इराणच्या प्रत्युत्तर हल्ल्यांमध्ये ड्रोनने हल्ला केलेल्या तेल टँकरवरील एका भारतीयाचा मृत्यू झाला आहे. पश्चिम आशियामध्ये सुमारे एक कोटी भारतीय कामगार राहतात, ज्यांनी २०२३–२४ मध्ये सुमारे ११८ अब्ज डॉलर्स आपल्या मायदेशी पाठवले. युद्धग्रस्त भागातून बाहेर पडण्यासाठी अनेक जण धडपडत आहेत; शेकडो दैनंदिन उड्डाणे रद्द झाल्यामुळे प्रवासाचा खर्चही वाढला आहे. २०२५ मध्ये स्वस्त रशियन कच्च्या तेलाच्या आयातीत घट करण्याची अमेरिकेने मागणी केली, आणि भारताने याला मान्यता दिल्याने ऊर्जेच्या धक्क्यांना सामोरे जाणे आणखी कठीण झाले आहे. या प्रदेशात कायमस्वरूपी संघर्ष टाळण्यासाठी नवी दिल्लीने आपल्या राजनैतिक आणि धोरणात्मक शक्तींचा प्रभावी वापर करणे गरजेचे आहे. अल्पावधीत, युद्धग्रस्त भागातील नागरिकांसाठी जलदगतीने एक्झिट कॉरिडॉर तयार करणे अत्यावश्यक आहे. दीर्घकालीन उपाय म्हणून, पुरवठा स्रोत वाढवणे आणि मोठ्या प्रमाणावर धोरणात्मक साठवणुकीची खात्री करणे आवश्यक आहे. पण ही समस्या फक्त तेलाची नाही; ती घरगुती अर्थव्यवस्था, उद्योग, महागाई आणि रोजगाराच्या सुरक्षिततेशी जोडलेली आहे. पेट्रोलच्या दरवाढीमुळे वाहनधारकांपासून शेतीपर्यंत प्रत्येक स्तर प्रभावित होतो. उद्योगांचा उत्पादन खर्च वाढतो, तयार वस्तूंच्या किमती वाढतात, आणि महागाई घरगुती बजेटवर थेट परिणाम करते. युद्धाचा दबाव फक्त घरगुती आणि औद्योगिक क्षेत्रावरच नाही; भारताच्या व्यापार धोरणांवरही थेट परिणाम होतो. चालू खाती, चलनवाढ आणि व्यापार संतुलन टिकवण्यासाठी, दीर्घकालीन पुरवठा स्रोत आणि साठवणूक धोरण निश्चित करणे गरजेचे आहे. युद्धग्रस्त भागातील भारतीय नागरिकांचे रक्षण, तेल आयात स्थिर ठेवणे आणि उद्योगांना स्थैर्य मिळवून देणे यासाठी नवी दिल्लीने जलद आणि ठोस उपाययोजना कराव्या लागतील. पश्चिम आशियामधील ही परिस्थिती भारताच्या राष्ट्रीय सुरक्षा आणि आर्थिक स्थैर्यासाठी धोकादायक आहे. युद्धाचे परिणाम दूरस्थ नाहीत; ते दररोजच्या जीवनात, उद्योग निर्णयांमध्ये, घरगुती खर्चात आणि नागरिकांच्या सुरक्षिततेत स्पष्ट दिसतात. त्यामुळे स्पष्ट होते की, भारताला फक्त तात्पुरती तयारी नव्हे, तर दीर्घकालीन उर्जा स्थैर्याचे धोरण राबवणे आवश्यक आहे. उर्जा सुरक्षा, आर्थिक स्थैर्य आणि नागरिकांचे संरक्षण यांचा समन्वय साधल्याशिवाय, भारताला या वाढत्या संघर्षाच्या वर्तुळात टिकवून ठेवणे शक्य होणार नाही. घरगुती अर्थव्यवस्थेला बचाव देणे, उद्योगांना स्थैर्य मिळवून देणे आणि व्यापार संतुलन राखणे यासाठी नवी दिल्लीने जागतिक आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर ठोस आणि जलद निर्णय घेणे आवश्यक आहे.

# मध्यपूर्वेतील संघर्ष आणि भारतासमोरील आव्हाने

**» अमेरिका आणि इस्रायलचा इराणवरचा हल्ला फक्त मध्यपूर्वेतील संघर्ष नाही, तर भारतासारख्या देशांच्या अर्थव्यवस्थेवर थेट प्रभाव पाडणारा आहे. तेलाच्या आयातीवर अवलंबून असलेला भारत महागाईच्या आव्हानांसमोर उभा आहे.**



समुद्राच्या अरुंद वाटेतील प्रवाह जसा जगाची ऊर्जा वाहत असतो, तसाच हा संघर्ष भारताच्या दैनंदिन जीवनावर थेट प्रभाव पाडतो. हॉर्मुज स्ट्रेटवरील अडथळा पेट्रोल पंपांवरची रांग, घरगुती बजेट, उद्योगांची किंमत आणि चालू खाती यावर ताण निर्माण करतो. भारताचे तेल आयातावर असलेले अवलंबित्व आणि महागाईच्या सतत वाढत्या दबावामुळे ही परिस्थिती संवेदनशील बनली आहे.

अमेरिका आणि इस्रायलच्या सैन्य कारवायीनंतर इराणने उत्तरक्रियात्मक हल्ले केले आणि मध्यपूर्वेतील तणाव मोठ्या प्रमाणावर वाढला. या संघर्षाचा थेट परिणाम भारतासारख्या देशांवर होतो कारण तेल, एलएनजी, कच्चा माल यांचे ८८–९० टक्के प्रमाण हॉर्मुज स्ट्रेटमार्गे वाहते. लहानसा अडथळा किंवा युद्धाचे क्षणिक वाढलेले संकट पेट्रोल, डिझेल, एलपीजी या सर्वकाही दरात झपाट्याने वाढ करून लोकांच्या घरगुती अर्थव्यवस्थेवर प्रहार करते.

घरगुती अर्थव्यवस्थेवर याचा परिणाम स्पष्ट दिसतो. कामगार वर्ग आणि मध्यमवर्गीय घरांचे बजेट ताणले जाते. पेट्रोलच्या दरवाढीमुळे फक्त वाहनचालक प्रभावित होत नाहीत; प्रवासी वाहतूक, लॉजिस्टिक कंपन्या, किराणा व्यवसाय आणि शेतीतील खर्च देखील वाढतो. उद्योगांमध्ये उत्पादन खर्च वाढतो, त्यामुळे तयार होणाऱ्या वस्तूंच्या किमती वाढतात. याचा परिणाम थेट महागाईवर होतो, आणि महागाईमुळे घरगुती खर्चाचा भार वाढतो.

बहिर्मुख भारतीय, खाडीतील कामगार, प्रवासी कर्मचारी यांनाही या संघर्षामुळे अप्रत्यक्षपणे किंवा थेट परिणाम जाणवतो. घरगुती खर्चाचा ताण वाढतो, कुटुंबांचे जीवनमान धोक्यात येते, रोजगाराची असुरक्षितता वाढते. युद्धाची ही लाट केवळ भौगोलिकदृष्ट्या दूर असली तरी ती घराघरात, रस्त्यावर, बाजारपेठेत दिसून येते. आपल्या रोजच्या खरेदीपासून ते उद्योगाच्या उत्पादन निर्णयांपर्यंत, प्रत्येक स्तरावर या संघर्षाचा प्रभाव जाणवतो.

राजकीय दृष्टिकोनातून भारताच्या परराष्ट्र धोरणाने नेहमीच संवाद आणि समन्वयावर भर दिला आहे. परंतु या संघर्षामुळे आपल्याला पुन्हा विचार करावा लागतो की, फक्त कूटनीतीपुरती मर्यादित राहणे पुरेसे नाही. आर्थिक आणि सामाजिक तयारी, घरगुती अर्थव्यवस्थेचे समन्वयन, उद्योगांचे स्थैर्य आणि नागरिकांचे कल्याण यांचा विचार न करता या संकटाचा सामना करणे कठीण ठरते. हॉर्मुज स्ट्रेटवरील संघर्षाचा परिणाम फक्त दूरच्या मैदानावर दिसत नाही; तो आपल्या शहरांमध्ये, गावांमध्ये, घरांमध्ये प्रत्यक्ष जाणवतो. तेल आणि एलपीजीच्या दरवाढीमुळे घरगुती बजेटवर ताण पडतो, उद्योग खर्चिक होतात, आणि कामगार वर्गाची असुरक्षितता वाढते. या आर्थिक परिणामांचा थेट संबंध आपल्या रोजच्या जीवनाशी आहे.

युद्धाचा परिणाम फक्त आर्थिकच नाही, तर सामाजिक आणि मानसिक स्तरावरही आहे. महागाईमुळे चिंता वाढते, असुरक्षितता निर्माण होते, आणि निर्णय घेणे अधिक कठीण होते. घरगुती निर्णय, उद्योग निर्णय, गुंतवणूक, बचत हे सर्व या संघर्षामुळे प्रभावित होतात. आपण जितका दूरवरच्या घटनांवर लक्ष ठेवतो, तितकाच त्याचा प्रभाव आपल्या जवळच्या जीवनावरही जाणवतो.

भारतासारख्या देशासाठी हे संकट शिकवण आहे की, जागतिक संघर्ष फक्त दूरवर राहात नाही. तो घरगुती अर्थव्यवस्था, उद्योग निर्णय, नागरिकांचे कल्याण आणि जीवनमान यांच्याशी घनिष्ठपणे जोडलेला आहे. घरगुती बजेटपासून ते चालू खाती, उद्योगांचे उत्पादन, लोकांची रोजगार सुरक्षा यांचा विचार न करता आपण यावर प्रभावी उपाय शोधू शकणार नाही.

हॉर्मुज स्ट्रेटवरील ताण, इराण-इस्रायल संघर्ष यांचा परिणाम आपल्या जीवनाच्या प्रत्येक पैलूवर जाण्यापूर्वीच त्याचा विचार करणे आवश्यक आहे. घरगुती खर्च, उद्योग, रोजगार, सुरक्षितता हे सर्व युद्धाच्या लाटांमुळे प्रभावित होत असताना, आपल्याला फक्त बाह्य धोरणावर नव्हे, तर आर्थिक आणि सामाजिक तयारीवरही भर द्यावा लागतो.

युद्ध हा निव्वळ लष्करी संघर्ष नाही; तर तो आपल्याला घरगुती अर्थव्यवस्थेत, उद्योगात, नागरिकांच्या जीवनात आणि सामाजिक ताणांमध्ये भौतिक आणि मानसिक रूपाने स्पर्श करतो. त्यामुळे मध्यपूर्वेतील संघर्षाचा परिणाम समजून घेणे आणि त्यानुसार धोरणात्मक निर्णय घेणे हे काळाची गरज आहे.

## संत तुकाराम महाराज बीज सोहळ्यासाठी देहू सज्ज

### लाखो वारकरी भाविकांची उपस्थिती अपेक्षित

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या वैकुंठगमन (बीज) सोहळ्यानिमित्त गुरुवार, दि. ५ मार्च रोजी देहूनगरीत लाखो वारकरी भाविकांची उपस्थिती अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर भाविकांच्या स्वागतासह सुरक्षेच्या दृष्टीने देहूनगर पंचायत प्रशासनाने व्यापक तयारी पूर्ण केली आहे.

सोहळा सुरळीत आणि सुरक्षित पार पडावा, चोरी अथवा अनुचित प्रकारांना आळा बसावा तसेच आपत्कालीन परिस्थितीत त्वरित कार्यवाही करता यावी यासाठी मोक्याच्या ठिकाणी एकूण ३४ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. कचरा डेपो येथे दोन, एसटीपी प्लांटवर दोन तसेच गर्दीच्या प्रमुख ठिकाणी अतिरिक्त कॅमेरे बसवून संपूर्ण परिसर निगराणीखाली ठेवण्यात येणार आहे.

स्वच्छतेच्या दृष्टीने मुख्य कमान, मंदिर परिसर आणि १४ टाळकरी मार्ग पाण्याने धुऊन स्वच्छ करण्यात आले आहेत. घाट, मुख्य व अंतर्गत रस्ते तसेच बाह्यवळण मार्गावरील खड्डे बुजविण्याचे काम अंतिम टप्प्यात असून सफाई कर्मचारी सातत्याने स्वच्छता मोहीम राबवत आहेत.

वारकऱ्यांसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था म्हणून गर्दीच्या ठिकाणी १६ टँकर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच सुमारे ९६ फिरती शौचालये उभारण्यात येत असून सुलभ शौचालयांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. संभाव्य आपत्कालीन परिस्थितीचा विचार करून तीन अग्निशामक बंब तैनात ठेवण्यात आले आहेत.

बीज सोहळ्यानिमित्त भाविकांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी सर्वतोपरी नियोजन करण्यात आले असून सुरक्षित, स्वच्छ आणि सुव्यवस्थित सोहळ्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे देहूनगर पंचायतीकडून स्पष्ट करण्यात आले.

## आर्य माडीवालेचा द्वितीय क्रमांक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निक (पीसीपी) येथील प्रथम वर्षाचा विद्यार्थी आर्य माडीवाले याने 'ग्रॅव्हिटी २के२६ – पिच परफेक्ट' स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला आहे. त्याने विकसित केलेल्या 'फूड डिकोड ए आय' या मोबाईल ॲप्लिकेशनला हेल्थकेअर आणि बायोटेक विभागात हा मान मिळाला. विजेत्याला प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह आणि ३० हजार रुपयांचे रोख पारितोषिक प्रदान करण्यात आले.

पुण्यातील के. जे. एज्युकेशन इन्स्टिट्यूटच्या ट्रिनिटी अकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग, पिसोळी येथे ही स्पर्धा पार पडली. विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांमधील १८० हून अधिक स्पर्धकांनी यात सहभाग घेतला होता. हेल्थकेअर आणि बायोटेक, फिनटेक आणि ई-कॉमर्स, ॲग्रीटेक आणि रुरल एम्पावरमेंट, सस्टेनेबल सोल्युशन्स आणि स्मार्ट सिटीज, स्किल्स आणि एज्युटेक अशा विविध विषयांवर प्रकल्प सादर करण्यात आले.

पीसीईटी कार्यालयात आर्य माडीवाले याचा सत्कार अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, प्राचार्या डॉ. विद्या बॅकॉड, संगणक विभाग प्रमुख मंगला माळकर आदी उपस्थित होते. आर्य माडीवाले यांनी सांगितले की, पॅकिंग केलेल्या खाद्यपदार्थावरील बारकोड स्कॅन केल्यानंतर त्या उत्पादनाचा न्यूट्री-स्कोअर, फॅटचे प्रमाण व इतर पोषणमूल्यांची माहिती त्वरित मिळते.

## विशेष मुलांसमवेत रंगपंचमी उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** रंगपंचमीच्या निमित्ताने भोई प्रतिष्ठानतर्फे आयोजित ३१ वा रंगपंचमी उत्सव उत्साहात पार पडला. शहरातील अनाथ मुले, मूकबधिर विद्यार्थी, रस्त्यावरील गरजू बालके तसेच अंध विद्यार्थ्यांसमवेत दरवर्षीप्रमाणे यंदाही रंगोत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर उपस्थित राहून विशेष मुलांबरोबर रंगांची उधळण करत आनंदोत्सवात सहभागी झाले.

विविध रंगांनी परिसर नटला होता. मुलांनी एकमेकांना रंग लावत आनंद व्यक्त केला. त्यांच्या चेहऱ्यावरचा उत्साह आणि समाधान पाहून उपस्थितांचे मन भारावून गेले.

परशुराम वाडेकर म्हणाले की, उपमहापौर म्हणून या कार्यक्रमात सहभागी होण्याची आणि मुलांसोबत रंगपंचमी साजरी करण्याची संधी मिळणे ही आनंदाची बाब आहे. भारत देश विविधतेतून एकात्मतेचा संदेश देतो. अनेक जाती-धर्म, परंपरा आणि संस्कृती यांची सांगड घालत आपण संविधानाच्या मूल्यांना बळकट करत आहोत, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात विविध सामाजिक संस्थांनी नाश्ता, पाणी व जेवणाची व्यवस्था केली होती. एका मुस्लिम कुटुंबीयांनी शिरकुरमा आणून सणात सहभाग नोंदवला. विविध धर्म आणि समाजघटकांच्या सहभागातून सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचा संदेश देण्यात आला.

## श्रीकृष्ण नीती आजही समाजासाठी दिशादर्शक

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** श्रीकृष्ण नीती म्हणजे केवळ कुरुक्षेत्राच्या रणांगणावर दिलेले उपदेश नव्हेत, तर भगवान श्रीकृष्णांचे संपूर्ण जीवनच नीतीचा आदर्श आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सखोल अभ्यास करून त्यातील किमान एखादा गुण आत्मसात करण्याची गरज आहे. श्रीकृष्णांचे विचार आजच्या समाजासाठीही तितकेच गरजेचे आणि दिशादर्शक आहेत, असे मत ज्येष्ठ विचारवंत मयूर भावे यांनी व्यक्त केले.

नागरिक सोशल फाउंडेशनतर्फे आयोजित 'गरज कृष्ण नीतीची' या विषयावरील व्याख्यानमालेत ते बोलत होते. यावेळी संस्थेचे वक्ता विभाग प्रमुख दीपक मेहेंदळे, विश्वस्त अमेय सप्रे, प्रीतम थोरवे आदी उपस्थित होते.

मयूर भावे यांनी सांगितले की, आजच्या काळात हिंसेचा जो अर्थ लावला जातो तो श्रीकृष्णांच्या विचारांशी सुसंगत नाही. समाजहितासाठी आवश्यक असलेला पराक्रम ही हिंसा नसून तो कर्तव्याचा भाग आहे, हे महाभारतातून स्पष्ट होते. अहिंसेचा चुकीचा अर्थ लावला जात असून, श्रीकृष्णांचा पराक्रम आणि व्यवहारज्ञानाचा विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याची आवश्यकता आहे.

भूतकाळाची जाणीव ठेवून, भविष्याचा वेध घेत वर्तमानकाळ प्रभावीपणे हाताळणे हीच श्रीकृष्ण नीती असल्याचे त्यांनी नमूद केले. कृतीपेक्षा उद्देशाला अधिक महत्त्व देणारी ही नीती असल्याने प्रत्येक तरुणाने सकारात्मक दृष्टिकोन ठेवून देशासाठी आपले योगदान काय असू शकते, याचा विचार करावा. हा विचार आचरणात आणल्यास भारत समृद्ध राष्ट्र म्हणून उदयास येईल, असेही त्यांनी सांगितले.

अमेय सप्रे यांनी राष्ट्रप्रथम हा विचार तरुणांपर्यंत पोहोचविण्यासाठी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगितले. 'भक्ती शक्ती' उपक्रमातून प्राचीन मंदिरांचा इतिहास समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न सुरू असून, बेटिंग ॲप्सवर बंदी घालण्याच्या मागणीसाठीही संस्थेने पुढाकार घेतल्याची माहिती त्यांनी दिली.

भारतीय संस्कृती श्रीराम आणि श्रीकृष्ण यांच्या विचारधारेवर उभी असल्याचे नमूद करत, आदर्शवाद आणि व्यवहारवाद या दोन्हींचा समतोल देशाच्या प्रगतीसाठी आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सायली गोडबोले जोशी यांनी केले, तर आभार पुष्कर सप्रे यांनी मानले.

### थेट मेट्रोने प्रवास करण्याचे स्वप्न साकार होणार

# लोहगाव विमानतळासाठी मेट्रो जोडणीचा मार्ग निश्चित

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** लोहगाव विमानतळापर्यंत थेट मेट्रोने प्रवास करण्याचे स्वप्न साकार होण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकण्यात आले आहे. सध्या कार्यरत असलेल्या वनाझ–रामवाडी मेट्रो मार्गिकेचा विस्तार कल्याणीनगरमार्गे विमानतळापर्यंत करण्याचा व्यवहार्य पर्याय निश्चित करण्यात आला असून, यासाठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) लवकरच तयार केला जाणार आहे.

केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. मेट्रो विमानतळापर्यंत नेण्यासाठी मांडण्यात आलेल्या सहा पर्यायांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. अखेरीस कल्याणीनगर येथील विद्यमान स्थानकापुढून 'स्पर लाईन'द्वारे विमानतळापर्यंत मेट्रो नेण्याचा पर्याय सर्वात व्यवहार्य ठरल्याचे स्पष्ट झाले. या पर्यायाला लोकप्रतिनिधींचा पाठिंबा मिळाल्याचे मोहोळ यांनी सांगितले.

सध्या वनाझ ते रामवाडी ही मेट्रो मार्गिका सुरू आहे. पुढील टप्प्यात रामवाडी ते वाघोली-विठ्ठलवाडीपर्यंत विस्ताराचे नियोजन आहे. मात्र, शहरातील हवाई प्रवासासाठी महत्त्वाचा असलेला लोहगाव विमानतळ मेट्रो नेटवर्कपासून दूर असल्याने प्रवाशांना रिक्षा, बस किंवा खासगी वाहनांचा पर्याय स्वीकारावा लागतो. ही गैरसोय दूर करण्यासाठी विमानतळ जोडणीचा डीपीआर तयार करण्याचे निर्देश यापूर्वीच देण्यात आले होते.

बैठकीत महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी सादरीकरण केले. कल्याणीनगर–सिम्बायोसिस कॉलेज–एरोमॉल असा मार्ग निवडल्यास भूसंपादन अत्यल्प लागेल. संरक्षण मंत्रालयाच्या हद्दीतील जागा टाळून विद्यमान रस्त्यांवरून मार्ग नेण्याचा पर्याय असल्याने आवश्यक परवानग्या जलद मिळण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.

शहराच्या वाढत्या विस्ताराचा विचार करून शेवाळेवाडी ते कात्रज-वाकड फाटा दरम्यान महामार्गालगत मेट्रो विकसित करण्याचाही विचार सुरू आहे. वनाझ ते चांदणी चौक आणि रामवाडी ते वाघोली या मार्गिकांची कामेही लवकरच सुरू होणार असल्याचा दावा करण्यात आला.

प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पुणे शहराला पहिल्यांदाच थेट मेट्रो–विमानतळ जोडणी मिळणार असून, त्यामुळे प्रवाशांचा वेळ आणि खर्च वाचण्याबरोबरच वाहतूक कोंडीतही मोठी घट होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. पुण्याच्या सार्वजनिक वाहतुकीच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

## वल्लभनगर आगारात एनसीएमसी नोंदणीला अडथळे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने रोख व्यवहारांना पर्याय देत पारदर्शक आणि सोयीस्कर सेवा उपलब्ध करून देण्यासाठी नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी) प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, पिंपरी-चिंचवडमधील वल्लभनगर आगारात या स्मार्ट कार्ड नोंदणी प्रक्रियेत अडथळे येत असल्याने प्रवाशांना वारंवार हेलपाटे मारावे लागत आहेत. परिणामी नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.

एसटी महामंडळाच्या सर्व गाड्यांमध्ये महिला सन्मान योजनेअंतर्गत महिलांना तिकीट दरात ५० टक्के सवलत देण्यात येते. ६५ ते ७५ वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांना ५० टक्के सवलत, तर ७५ वर्षांवरील नागरिकांना अमृत ज्येष्ठ नागरिक योजनेअंतर्गत मोफत प्रवासाची सुविधा आहे. याशिवाय दिव्यांगांसह विविध घटकांना तिकीट दरात सवलत देण्यात येते. त्यामुळे एसटीकडे प्रवाशांचा ओढा वाढलेला आहे.

या पार्श्वभूमीवर एनसीएमसी प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला असून वल्लभनगर आगारात नोंदणी सुरू करण्यात आली आहे. मात्र, तांत्रिक अडचणी आणि प्रक्रियेतील विस्कळीतपणामुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार आहे.

नोंदणी प्रक्रिया सध्या सुरळीत नसल्याने नागरिकांनी आगार प्रशासनाच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त केली आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### तुकाराम बीजनिमित्त अतिरिक्त बससेवा

**पिंपरी :** संतश्रेष्ठ संत तुकाराम महाराज यांच्या तुकाराम बीजेनिमित्त देहूगावमध्ये होणाऱ्या धार्मिक सोहळ्यासाठी यंदाही राज्याच्या विविध भागांतून हजारो भाविक दाखल होणार आहेत. ही वाढती गर्दी लक्षात घेऊन पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडने (पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड) ६ मार्चदरम्यान देहूगावकडे अतिरिक्त बससेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे या जादा बसफेऱ्यांसाठी कोणताही वेगळा दर आकारला जाणार नसून, नियमित तिकीट दरातच ही सेवा उपलब्ध असेल. ५ मार्च रोजी, म्हणजेच तुकाराम बीजेच्या मुख्य दिवशी, सर्वाधिक २०७ जादा बसफेऱ्यांचे नियोजन करण्यात आले आहे. या बस स्वारगेट, मनपा भवन, निगडी, पुणे स्टेशन, देहूरोड स्टेशन आणि आळंदी येथून धावणार आहेत.

### हातभट्टी दारू विक्रीवर छापा

**लोणी काळभोर :** कदमवाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील कवडीमाळवाडी परिसरात हातभट्टी दारू विक्री सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर लोणी काळभोर पोलीस ठाणे यांच्या पथकाने मंगळवारी (दि. ३) सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी सुमारे १५ लिटर हातभट्टी दारू जप्त करत तिघांना अटक केली. अक्षय बजरंग मुळेकर (वय २५), मंदा बजरंग मुळेकर (वय ४५, दोघेही रा. हनुमान मंदिराजवळ, कवडीमाळवाडी, दत्तपार्क, कदमवाकवस्ती, ता. हवेली, जि. पुणे) तसेच राहूल बाळकृष्ण तावरे (वय ४६, रा. भेकराईनगर, लेन नं. २, फुरसुंगी, ता. हवेली, जि. पुणे) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. या प्रकरणी पोलीस हवालदार संतोष रावसाहेब तांदळे यांनी सरकारतर्फे फिर्याद दाखल केली असून पुढील तपास सुरू आहे.

### शिरूर-चाकण-तळेगाव-कर्जत-उरण कॉरिडॉरला गती

# मुंबई–पुणे वाहतूक कोंडीला सशक्त पर्याय

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर :** मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गवरील वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडीला पर्याय म्हणून प्रस्तावित शिरूर–चाकण–तळेगाव–कर्जत–उरण मल्टिनोडल कॉरिडॉर प्रकल्पाला राज्य सरकारने तत्त्वत: मंजुरी दिल्याची माहिती समोर आली आहे. या संदर्भात विधानसभेत पाठपुरावा करणारे आमदार बाबाजी काळे यांच्या प्रयत्नांना यश मिळाल्याचे सांगितले जात आहे.

गेल्या काही महिन्यांत द्रुतगती मार्गावर अनेक वेळा मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली. नुकत्याच घडलेल्या घटनेत ३० तासांहून अधिक काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. अपघात, वाहन बिघाड आणि दुरुस्ती कामांमुळे हजारो प्रवासी व मालवाहू वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागला. एकाच मार्गावर अवलंबून असलेली पुणे–मुंबई वाहतूक व्यवस्था किती तणावाखाली आहे, हे यामुळे स्पष्ट झाले. दीर्घकालीन उपाय म्हणून सुमारे १३५ किलोमीटर लांबीचा चारपदरी शिरूर – चाकण – तळेगाव – कर्जत – उरण कॉरिडॉर प्रस्तावित आहे. हा मार्ग कार्यान्वित झाल्यास पुणे, पिंपरी-चिंचवड तसेच नगर रस्त्यावरील वाहतुकीवरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या कॉरिडॉरमुळे शिरूर व चाकण एमआयडीसी परिसरातील औद्योगिक वाहतूक थेट जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जेएनपीटी), उरण येथे जोडली जाणार आहे. त्यामुळे मालवाहतूक अधिक वेगवान व सुलभ होईल. परिणामी द्रुतगती मार्ग तसेच नगर रस्त्यावरील गर्दी कमी होण्यास मदत होईल.

या मार्गामुळे पुणे–पिंपरी चिंचवड परिसरातील वाहतुकीवरील ताण ७० ते ८० टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकतो, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित करून राज्य सरकारचे लक्ष वेधण्यात आमदार काळे यशस्वी ठरले.

प्रकल्पाच्या तत्त्वत: मंजुरीनंतर प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष कामाला लवकर गती मिळावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. वाढती वाहतूक आणि औद्योगिक विकास लक्षात घेता हा कॉरिडॉर भविष्यातील दृष्टीने महत्त्वाचा पर्याय ठरणार असल्याचे मत व्यक्त होत आहे.

मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक कोंडीला पर्याय म्हणून सभागृहात सातत्याने मागणी केली. हा रस्ता केवळ खेड तालुक्यासाठी नव्हे, तर संपूर्ण राज्याच्या विकासासाठी महत्त्वाचा ठरेल. पुणे व पिंपरी चिंचवडमधील वाहतूक कोंडी सोडविण्यास मदत होईल. तसेच खेड तालुक्यातील पर्यटनालाही चालना मिळेल, असे आमदार बाबाजी काळे यांनी सांगितले.

## बुलेटच्या कर्कश सायलेन्सरचा त्रास; कारवाईची मागणी



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** शहरी भागासह ग्रामीण भागातही बुलेट दुचाकींचा वाढता ट्रेंड दिसून येत आहे. मात्र, काही वाहनचालकांकडून कंपनीचे मूळ सायलेन्सर काढून त्याऐवजी कर्कश आवाज करणारे बदललेले सायलेन्सर बसविले जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या फडफडीच्या मोठ्या आवाजामुळे ज्येष्ठ नागरिक तसेच हृदयविकाराने ग्रस्त रुग्णांना त्रास होत असल्याची तक्रार आहे.

जुन्नर तालुक्यात नियमबाह्य सायलेन्सर लावलेली अनेक वाहने दिवसा आणि रात्रीही मोठ्या आवाजात फिरताना दिसतात. रात्रीच्या वेळी या कर्णकर्कश आवाजामुळे नागरिकांच्या झोपेचा खोळंबा होत असून परिसरातील शांतता भंग होत आहे. त्यामुळे अशा वाहनांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी होत आहे.

वैद्यकीयदृष्ट्या हृदयविकाराच्या रुग्णांसाठी अचानक होणारा तीव्र आवाज धोकादायक ठरू शकतो, अशीही चिंता व्यक्त केली जात आहे. नियमांचे उल्लंघन करून सायलेन्सर बदलणाऱ्या वाहनचालकांवर अंकुश का नाही, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. सार्वजनिक आरोग्य आणि कायदा सुव्यवस्था लक्षात घेता अशा वाहनचालकांवर कठोर कारवाई करून कायद्याचा धाक दाखविण्याची आवश्यकता असल्याचे मत ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केले आहे.

## शरद सहकारी बँकेच्या दैनंदिन ठेव प्रतिनिधींचा सन्मान



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** आंबेगाव तालुक्यातील मंचर येथे शरद सहकारी बँकेच्या वतीने सेवक प्रशिक्षण व स्नेहमेळाव्याचे आयोजन उत्साहात करण्यात आले. यावेळी बँकेच्या सर्व शाखांतील दैनंदिन ठेव प्रतिनिधींचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमात मंचर शाखेचे दैनंदिन ठेव प्रतिनिधी जयेश विनोदचंद्र शहा यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच संदीप शेवाळे, विवेक शिंदे, दिनकर मोरडे, राजाराम भोर, सागर पाचपुते आणि केशर सासवडे यांचाही सत्कार करण्यात आला. बँकेचे अध्यक्ष देवेंद्रशेठ शहा यांनी ठेव प्रतिनिधींच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या योगदानाची दखल घेतली. यावेळी संचालक शिवाजी लोंढे, अजय घुले, दौलतराव लोखंडे, दत्ताशेठ थोरात, जयसिंग थोरात, मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र देशमुख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब जाधव तसेच विभागप्रमुख, शाखाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. जयेश शहा यांनी मंचर शाखेत कार्यरत असताना बँकेच्या व्यवसायवृद्धीत मोलाचे योगदान दिले आहे. नियमित संपर्क, ग्राहकांशी जिव्हाळ्याचे संबंध आणि प्रामाणिक सेवेमुळे ठेवीत लक्षणीय वाढ साध्य झाल्याने त्यांच्या कार्याचा विशेष गौरव करण्यात आला.

## आ. बाबाजी काळे यांची रस्त्यांची पाहणी

### खड्डे बुजविण्याच्या संबंधित अधिकाऱ्यांना सूचना

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर :** खेड-आळंदी मतदारसंघाचे आमदार बाबाजी काळे यांनी अधिवेशनाला रवाना होण्यापूर्वी मंगळवारी (दि. ३) रात्री स्थानिक नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत तिन्हेवाडी परिसरात भेट देत रस्त्यांची पाहणी केली.

तिन्हेवाडी गावातून पुणे–नाशिक महामार्गकडे जाणारा चासकमान कालव्यालगतचा रस्ता तसेच हुतात्मा राजगुरु क्रीडा संकुलकडे जाणाऱ्या मार्गावर मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. हा रस्ता राजगुरुनगर नगरपरिषदेच्या हद्दीत असून खड्डयांमुळे लहान-मोठे अपघात घडल्याच्या तक्रारी होत्या. अनेकांना दुखापती झाल्याने ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला होता. खड्डे बुजविण्यासाठी तिन्हेवाडीच्या सरपंच प्रतीक्षा पाचारणे, उपसरपंच विठ्ठल वरकड, रंगनाथ आरुडे व इतरांनी पाठपुरावा केला होता. मात्र प्रतिसाद न मिळाल्याने ग्रामस्थांनी आमदार काळे यांच्याकडे धाव घेतली.

वस्तुस्थितीची पाहणी केल्यानंतर आमदार काळे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवर संपर्क साधून सकाळपर्यंत खड्डे बुजविण्याच्या सूचना दिल्या. कोणतेही कारण नको, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी क्रीडा संकुल परिसरातील रस्ता सिमेंट कॉंक्रीट (सीसी) करण्याचा निर्णय घेण्यात येईल, तसेच परिसरात लवकरच पार्किंग व्यवस्था उभारण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

पाहणीवेळी तिन्हेवाडीच्या सरपंच प्रतीक्षा पाचारणे, तिन्हेवाडी सोसायटीचे माजी अध्यक्ष भास्कर जगदाळे, काळेवाडीचे माजी सरपंच मुरलीधर भागडे, माजी सरपंच रोहिदास आरुडे, संतोष पाचारणे, विजय आरुडे, भगवान पाचारणे, प्रशांत पाचारणे, निखिल पाचारणे यांच्यासह स्थानिक नागरिक उपस्थित होते.

मतदारसंघातील स्थानिक प्रश्नांवर तातडीने लक्ष देऊन रात्रीच्या वेळीही पाहणी केल्याने नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. संबंधित कामे लवकर पूर्ण होतील, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

## ग्रहणानिमित्त माऊली मंदिरात धार्मिक विधी



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** खग्रास चंद्रग्रहणाच्या पार्श्वभूमीवर श्रीक्षेत्र आळंदी येथे मंगळवारी (दि. ३) सायंकाळी ६.४४ ते ६.४८ या कालावधीत ग्रहण लागल्याने विविध धार्मिक विधी पार पडले. श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिर येथे परंपरेनुसार धार्मिक कार्यक्रम हरिनाम गजरात संपन्न झाले.

ग्रहणकाळात श्रींचे विधीवत स्नान घालून पवमान अभिषेक, जलाभिषेक, धुपारती आणि महानैवेद्य करण्यात आला. संजीवन समाधीवर जलाभिषेक करण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली. ग्रहणकाळ संपल्यानंतर वेदमंत्रांच्या जयघोषात श्रींची पूजा, आरती व धुपारती पार पडली. दैनंदिन धार्मिक विधी शास्त्रोक्त पद्धतीने करण्यात आले.

ग्रहणकाळात मंदिरातील धार्मिक परंपरा काटेकोरपणे पाळण्यात आल्या. भाविकांनी हरिनाम गजरात सहभाग नोंदवला. इंद्रायणी नदी येथे वेदमंत्र साधक, विद्यार्थी आणि भाविकांनी स्नान करून जप-जाप, ध्यानधारणा व साधना केली. सुमारे अडीच तास साधकांनी नदीपात्रात उभे राहून विशेष साधना केल्याचे सांगण्यात आले. रामकृष्ण हरी, जय जय रामकृष्ण हरी तसेच श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे या नामजपाने परिसर दुमदुमून गेला. अखंड नामस्मरणात भाविकांनी ग्रहण पर्वणी साधली.

दरम्यान, सोमवारी (दि. २) होलिकोत्सवही आळंदी पंचक्रोशीत पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. मंदिरांसह घराघरांत होळी पूजन करून पुरणपोळीचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. धार्मिक परंपरा जपत उत्साहात होळी साजरी करण्यात आल्याचे दिसून आले.

## देशी पिस्तूल बाळगल्याप्रकरणी तीन वर्षांची शिक्षा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** देशी बनावटीचे पिस्तूल आणि जिवंत काडतूस बेकायदेशीररीत्या जवळ बाळगल्याप्रकरणी खेड न्यायालयातील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एस. व्ही. उतकर यांनी आरोपीस तीन वर्षे सक्तमजुरी व तीन हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास एक महिना अतिरिक्त कारावास भोगावा लागणार आहे. दिगंबर उर्फ दिग्या विठ्ठल कदम (रा. पद्मावती झोपडपट्टी, आळंदी ता. खेड) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. १ जानेवारी २०२५ रोजी मध्यरात्री सुमारे सव्वाबारा वाजता आळंदी नगर परिषदेच्या वाहनतळाजवळ आरोपीकडे देशी बनावटीचे पिस्तूल आढळून आले. याप्रकरणी आळंदी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

## वळसे पाटील ज्युनिअर कॉलेजची जीएमआरटी प्रकल्पास भेट



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त जुन्नर तालुक्यातील खोडद येथे असलेल्या जगप्रसिद्ध जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप (जीएमआरटी) प्रकल्पास विद्यार्थी व विज्ञानप्रेमींनी मोठ्या संख्येने भेट दिली.

भीमाशंकर शिक्षण संस्थेचे दत्तात्रय वळसे पाटील उच्च माध्यमिक विद्यालय, पारगाव कारखाना (ता. आंबेगाव) येथील विद्यार्थी व शिक्षकांनीही या उपक्रमात सहभाग घेतला.

थोर शास्त्रज्ञ सी. व्ही. रामन यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विशेष विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विज्ञानाचा वारसा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी विद्यार्थ्यांना यावेळी मिळाली.

टाटा मूलभूत संशोधन संस्था यांच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या या केंद्रात दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य विज्ञान प्रदर्शन भरविण्यात आले. प्रदर्शनात रेडिओ दुर्बिणींची कार्यपद्धती, आकाशदर्शन, तसेच खगोलशास्त्रातील संशोधनाची माहिती शास्त्रज्ञांनी सोप्या भाषेत दिली. विविध शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी तयार केलेले विज्ञान प्रकल्पही यावेळी प्रदर्शित करण्यात आले.

विद्यार्थ्यांना शास्त्रज्ञांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळाली. अंतराळ संशोधन, खगोलभौतिकी, ताऱ्यांचा जन्म-मृत्यू आणि कृष्णविवरांच्या अभ्यासासंबंधी माहिती देताना शास्त्रज्ञांनी रेडिओ दुर्बिणींचे महत्त्व अधोरेखित केले.

पुणे, अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यांतून मोठ्या संख्येने विद्यार्थी व पर्यटक खोडद येथे दाखल झाले होते.

प्रचंड आकाराच्या अँटेना पाहून विद्यार्थ्यांनी आश्चर्य व्यक्त केले. या शैक्षणिक भेटीमुळे विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाला चालना मिळेल, असा विश्वास शिक्षकांनी व्यक्त केला.

### ग्रामीण संस्कृती व परंपरा जपण्यास अशा सणांमुळे बळ

# धुलिवंदनानिमित्त वीरांची मिरवणूक उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील शिरदाळे येथे धुलिवंदनाच्या निमित्ताने वीरांची पारंपरिक मिरवणूक उत्साहात संपन्न झाली. यावर्षी चंद्रग्रहण असल्याने हा कार्यक्रम सकाळी दहा वाजता पार पडला.

परंपरेनुसार गावातील लहान मुले आणि तरुणांना 'वीरदेव' म्हणून सजवले जाते. गळ्यात व पायात चाफ्याच्या फुलांचे हार, कमरेला साडीची सजावट, डोक्यावर फेटा, गळ्यात अलंकार, हातात काठी आणि अंगावर गंधाचे ठसे असा पारंपरिक पेहराव केला जातो. त्यानंतर पारंपरिक वाद्यांच्या जयघोषात प्रत्येक घरातील वीरदेवाला गावच्या मुख्य चौकात आणले जाते.

मुख्य चौकात महिलांकडून पाण्याचा गोलाकार फेरा तयार केला जातो. वीरदेव अनवाणी असल्याने उन्हापासून संरक्षण व्हावे, हा त्यामागील उद्देश असल्याचे ग्रामस्थ सांगतात. त्यानंतर वीरदेवांना नाचवण्यात येते.

गावातील ज्येष्ठ आणि तरुण मंडळी घाई-लेझीम धरून सहभागी होत असल्याने वातावरण पारंपरिक रंगात रंगते.

मिरवणूक मुख्य चौकातून मारुती मंदिराचे दर्शन घेऊन तळ्यावरील महादेव मंदिर व होळीला प्रदक्षिणा घालते आणि पुन्हा चौकात येते. तेथे सर्व वीरदेवांना पुन्हा नाचवून प्रत्येकजण आपला वीरदेव खांद्यावर घेऊन घरी नेतो. घराच्या अंगणात विधीवत बसवून महिलांकडून ओवाळणी केली जाते, पाय धुतले जातात आणि गोड प्रसाद अर्पण केला जातो.

शेकडो वर्षांची ही परंपरा आजही ग्रामस्थांच्या एकोप्याने जपली जात आहे. बाहेरगावी किंवा शहरात स्थायिक झालेली मंडळीही या सणासाठी आवर्जून गावात उपस्थित राहतात. ग्रामीण संस्कृती व परंपरा जपण्यास अशा सणांमुळे बळ मिळत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

यावेळी ताशा व सनईच्या तालावर कोंडीभाऊ तांबे, गेनभाऊ रणपिसे, शंकर तांबे, संभाजी सरडे, प्रभाकर तांबे, रामचंद्र रणपिसे, बाळू चौधरी, मच्छिंद्र चौधरी आदींनी घाई-लेझीम धरून सहभाग घेतला. ग्रामस्थांनी वाजंत्री मंडळींना ओवाळणी म्हणून रक्कमही दिली. कार्यक्रमास गावातील महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पारगाव येथे वीरभद्र देवाची शेकडो वर्षांची परंपरा जिवंत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील पारगाव येथे वीरभद्र देवाची शेकडो वर्षांची परंपरा आजही मोठ्या श्रद्धा आणि उत्साहात जपली जात आहे. होळी सणाच्या दुसऱ्या दिवशी, धुलिवंदनाच्या निमित्ताने हा पारंपरिक सोहळा दरवर्षी रंगतो.

या दिवशी गावातील लहान मुलांना पारंपरिक वेशभूषेत सजवून ग्रामदैवत मुक्तादेवीसमोर आणले जाते. साजशृंगार केलेली ही मुले गोलाकार फेर धरून नृत्य करतात. ढोल-ताशांच्या तालावर लेझीमसह विविध पारंपरिक खेळ सादर होत असल्याने वातावरण भक्तिमय आणि उत्साहपूर्ण बनते. गावातील ज्येष्ठ नागरिकही या सोहळ्यात सक्रिय सहभाग नोंदवून परंपरेची धुरा पुढे नेताना दिसतात.

कार्यक्रमाच्या शेवटी वीरदेवाला घरी नेण्याची पारंपरिक प्रथा पार पाडली जाते. देवाची तळी व भंडारा करून सोहळ्याची सांगता केली जाते. त्यानंतर गावातील महिला लहान मुलांची 'वीरदेव' म्हणून विधीवत पूजा करून दर्शन घेतात. या परंपरेमुळे गावात धार्मिक एकात्मता आणि सांस्कृतिक सलोखा वृद्धिंगत होत असल्याचे ग्रामस्थ सांगतात. काळाच्या ओघात अनेक प्रथा-परंपरा लोप पावत असताना पारगावकरांनी ही परंपरा जपली आहे.

## सारांश वृत्त

### तेलंगणामध्ये होळी उत्साहात साजरी

**हैदराबाद:** तेलंगणामध्ये बुधवारी रंगांचा सण होळी उत्साहात साजरा करण्यात आला. लोकांनी एकमेकांच्या चेहऱ्यावर 'गुलाल' लावला आणि मित्र आणि नातेवाईकांना मिठाई वाटली. हैदराबाद आणि राज्यातील इतर शहरांमधील अपार्टमेंट आणि इतर निवासी संकुलांमध्ये आयोजित होळी उत्सवात मुले आणि तरुणांनी आनंद घेतला. इंदिरा पार्क वॉकर्स असोसिएशनने येथील इंदिरा पार्कमध्ये हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला.

### बेंगळुरूत ३४ आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द

**बेंगळुरू :** मध्य पूर्वेतील संघर्षामुळे विमान वाहतूक विस्कळीत झाल्यामुळे बुधवारी केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर तब्बल ३४ आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द करण्यात आली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. ४ मार्च रोजी रात्री ११:५९ वाजेपर्यंत बेंगळुरू विमानतळावर हवाई निर्बंधांमुळे १८ आगमन आणि १६ निर्गमन रद्द करण्यात आल्याचे विमानतळ अधिकाऱ्यांनी सांगितले. रद्दीकरणामुळे बेंगळुरूला पश्चिम आशियाई शहरांशी जोडणाऱ्या अनेक प्रमुख आंतरराष्ट्रीय क्षेत्रांवर परिणाम झाला, ज्यात अबू धाबी, रियाध, जेद्दाह, दम्मम, दुबई आणि दोहा यांचा समावेश आहे.



### हत्तीच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू

**वायनाड (केरळ) :** येथील सुलतान बाथेरी येथे बुधवारी सकाळी हत्तीच्या संशयास्पद हल्ल्यात एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला. सुलतान बाथेरी येथील वडक्कनाड येथील स्थानिक रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, पीडित राजीव हा त्याच्या शेतात घुसलेल्या हत्तीला हाकलण्यासाठी गेला होता. तथापि, तो परत न आल्याने, त्यांनी तपासणी केली आणि त्याला जमिनीवर पडलेले आढळले आणि त्याच्याभोवती हत्तीच्या पावलांचे ठसे होते, असे एका स्थानिक रहिवाशाने एका टीव्ही चॅनेलला सांगितले.

## अमेरिकेने कराची-लाहोरमधील कर्मचाऱ्यांना परत बोलावले

# इराण संघर्षाची छाया पाकिस्तानपर्यंत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** मध्यपूर्वेत अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाचे पडसाद आता पाकिस्तानमध्ये उमटू लागले आहेत. २८ फेब्रुवारी रोजी इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा अमेरिका-इस्रायलच्या संयुक्त हल्ल्यात मृत्यू झाल्यानंतर परिस्थिती अधिकच तणावपूर्ण झाली आहे. या घटनेनंतर इराणने क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ल्यांद्वारे प्रत्युत्तर दिले असून संपूर्ण प्रदेशात अस्थिरता वाढली आहे.

या पार्श्वभूमीवर पाकिस्तानमध्ये खामेनी यांच्या हत्येविरोधात हिंसक निदर्शने झाली. परिस्थिती गंभीर बनत असल्याने अमेरिकेने बुधवारी कराची आणि लाहोर येथील आपल्या वाणिज्य दूतावासातील काही कर्मचाऱ्यांना देश सोडण्याचे आदेश दिले.



अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने जारी केलेल्या निवेदनानुसार, लाहोर आणि कराची येथील अमेरिकन वाणिज्य दूतावासांतील गैर-आणीबाणीच्या कर्मचाऱ्यांना तसेच त्यांच्या कुटुंबीयांना सुरक्षेच्या कारणास्तव पाकिस्तान सोडण्यास सांगण्यात आले आहे. सध्याची सुरक्षा परिस्थिती लक्षात घेता ६ मार्चपर्यंतच्या सर्व व्हिसा अपॉइंटमेंट रद्द करण्यात आल्या आहेत. मात्र, इस्लामाबाद येथील अमेरिकन दूतावासाच्या कामकाजात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. प्रवास सल्लागारामध्ये पाकिस्तानमध्ये दहशतवादी हल्ल्यांचा धोका कायम असल्याचा इशाराही देण्यात आला आहे. दहशतवादी कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय वाहतूक केंद्रे, हॉटेल्स, बाजारपेठा, मॉल्स, लष्करी तळ, विमानतळ, रेल्वे स्थानके, शाळा, रुग्णालये, प्रार्थनास्थळे आणि सरकारी इमारतींना लक्ष्य करू शकतात, असे त्यात नमूद आहे.

दरम्यान, कराची आणि लाहोर येथील अमेरिकन वाणिज्य दूतावासाबाहेर मोठ्या प्रमाणावर निदर्शने झाली. कराचीमध्ये निदर्शकांनी दूतावासात घुसण्याचा प्रयत्न केल्याची माहिती असून, चकमकीत काही जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. लाहोरमध्येही विद्यार्थी आणि मानवाधिकार कार्यकर्त्यांनी निषेध नोंदवला.

२८ फेब्रुवारीच्या हल्ल्यानंतर इराणने आखाती देशांतील अमेरिकन तळांवर क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले केल्याचे सांगितले जात आहे. वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेने सौदी अरेबिया, ओमान आणि सायप्रस येथील गैर-आणीबाणीच्या कर्मचाऱ्यांनाही स्वेच्छेने देश सोडण्याची परवानगी दिली आहे.

## राज्यसभेसाठी भाजपची चार उमेदवारांची घोषणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारतीय जनता पक्ष यांनी आगामी राज्यसभा द्वैवार्षिक निवडणुकीसाठी बुधवारी चार उमेदवारांची नावे जाहीर केली. केंद्रीय मंत्री रामदास आठवले, पक्षाचे सरचिटणीस विनोद तावडे, रामराव वडकुते आणि माया चिंतामण इवनाटे यांचा यामध्ये समावेश आहे.

यापूर्वी भाजपने सहा राज्यांतील नऊ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली होती. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे प्रमुख असलेले आठवले पुन्हा एकदा राज्यसभेत जाण्यासाठी सज्ज आहेत, तर विनोद तावडे यांचा हा पहिलाच राज्यसभा प्रवेश असेल.

राज्यसभा निवडणुका १६ मार्च रोजी होणार असून त्याच दिवशी मतमोजणी होणार आहे. एप्रिलमध्ये विविध तारखांना रिक्त होणाऱ्या दहा राज्यांतील ३७ जागांसाठी ही निवडणूक होत आहे. महाराष्ट्रातील सात, तामिळनाडूतील सहा, पश्चिम बंगाल आणि बिहारमधील प्रत्येकी पाच, ओडिशातील चार, आसाममधील तीन, हरियाणा, तेलंगणा आणि छत्तीसगडमधील प्रत्येकी दोन तसेच हिमाचल प्रदेशातील एका जागेचा यात समावेश आहे.

ओडिशातून पक्षाने राज्य युनिटचे अध्यक्ष मनमोहन सामल आणि विद्यमान सदस्य सुजित कुमार यांना उमेदवारी दिली आहे. सामल यांचा २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत पराभव झाला होता. बिहारमधून सरचिटणीस शिवेश कुमार तर हरियाणामधून माजी खासदार संजय भाटिया यांना उमेदवारी देण्यात आली आहे. राष्ट्रीय सरचिटणीस अरुण सिंह यांनी उमेदवारांच्या नावांना केंद्रीय निवडणूक समितीची मान्यता असल्याचे स्पष्ट केले.

महाराष्ट्रात एप्रिलमध्ये सात जागा रिक्त होत असून २८८ सदस्यांच्या विधानसभेत २३० हून अधिक आमदारांचा पाठिंबा असलेल्या महायुतीकडे चारही उमेदवार निवडून आणण्याइतकी ताकद आहे. मुदत संपत असलेल्या सदस्यांमध्ये शरद पवार, रामदास आठवले, फौजिया खान, रजनी पाटील, प्रियंका चतुर्वेदी, धनंजय पाटील आणि भागवत कराड यांचा समावेश आहे.

## पूंछमध्ये घुसखोरीचा प्रयत्न उधळला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरमधील पूंछ जिल्ह्यातील सीमावर्ती भिंबर गली परिसरात दहशतवाद्यांनी घुसखोरीचा प्रयत्न केल्याचे उघड झाले असून, तो सैन्याने हाणून पाडल्याची माहिती लष्कराने बुधवारी दिली.

जम्मूस्थित व्हाईट नाईट कॉर्प्स यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये सांगितले की, विश्वसनीय गुप्तचर माहिती आणि सातत्यपूर्ण देखरेखीच्या आधारे पहाटे भिंबर गलीच्या सामान्य भागात संशयास्पद हालचाली आढळून आल्या.

लष्कराने तात्काळ आणि निर्णायक प्रत्युत्तर देत उत्कृष्ट



रणनीतिक कारवाई केल्याचे नमूद करण्यात आले आहे. जवानांनी वेगाने कारवाई करत घुसखोरीचा प्रयत्न पूर्णतः उधळून लावला आणि नियंत्रण रेषेचे कोणतेही उल्लंघन होऊ दिले नाही. "समन्वित जमिनीवरील कारवाईद्वारे शत्रूचे मनसुबे प्रभावीपणे हाणून पाडण्यात आले," असे लष्कराने स्पष्ट केले. या भागात जमिनीवरील तसेच हवाई देखरेख अधिक मजबूत करण्यात आली असून, सैन्याची पुनर्तैनाती करून कडक वर्चस्व राखण्यात येत आहे. संपूर्ण परिसरात मजबूत ऑपरेशनल पवित्रा आणि वाढीव सतर्कता कायम असल्याचे लष्कराने नमूद केले. "भिंत सतर्क आहे; घुसखोरीचा प्रत्येक प्रयत्न अयशस्वी ठरेल," असा ठाम इशाराही देण्यात आला.

## भारताचे मौन अनाकलनीय: मेहबूबा मुफ्ती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**श्रीनगर :** पीडीपी अध्यक्षा मेहबूबा मुफ्ती यांनी इराणविरुद्ध अमेरिका-इस्रायलच्या कारवाईबाबत भारताने भूमिका न घेतल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. अणुचाचण्यांनंतर भारतावर निर्बंध लादले गेले होते, त्या वेळी इराणने नवी दिल्लीची साथ दिली होती, याची आठवण त्यांनी करून दिली.

पत्रकारांशी संवाद साधताना त्या म्हणाल्या की, "आपण लोकशाही देश आहोत, मात्र इराणमधील घडामोडींवर देशाच्या नेतृत्वाने निषेध व्यक्त केलेला नाही किंवा तेथील लोकांबद्दल शोक व्यक्त केलेला नाही. जम्मू-काश्मीरमधील नेतृत्वानेही भूमिका घेतलेली नाही."

भारताचे इराणशी ऐतिहासिकदृष्ट्या मजबूत संबंध राहिले असल्याचे त्यांनी नमूद केले. "काश्मीर मुद्द्यावर बहुतांश मुस्लिम देश पाकिस्तानच्या बाजूने उभे राहिले, मात्र इराणने भारताची साथ दिली. निर्बंधांच्या काळात इराणने भारताला तेलपुरवठा केला. तरीही आज देशाच्या नेतृत्वाने इराणवरील कारवाईचा निषेध केलेला नाही," असे त्या म्हणाल्या.

दरम्यान, मुफ्ती यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या प्रतिकात्मक पुतळ्यांचे दहन केले. "आम्ही थेट निषेध करू शकत नाही, म्हणून या सैतानी शक्तींचे पुतळे जाळले. जम्मू-काश्मीरमधील लोक, विशेषतः खोऱ्यातील जनता, इराणच्या पाठीशी उभी आहे," असे त्या म्हणाल्या.

जागतिक व्यवस्था सध्या गोंधळलेली असल्याची टीकाही त्यांनी केली. "आज कोणतीही प्रभावी जागतिक व्यवस्था अस्तित्वात नाही. इराणसारख्या सार्वभौम देशावर हल्ला होत असताना कोणीही ठोस भूमिका घेत नाही," असे त्यांनी नमूद केले.

आखाती आणि मध्यपूर्वेतील काही देश अमेरिकेला तळ उपलब्ध करून देत या कारवाईला मूक समर्थन देत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

पाकिस्तानवर टीका करताना, सौदी अरेबियासोबत झालेला अलीकडील करार इस्रायलविरोधात नसून इराणविरोधात असल्याचे दिसते, असे त्यांनी म्हटले.

इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या हत्येविरोधात खोऱ्यात झालेल्या निदर्शनांदरम्यान ताब्यात घेतलेल्या नागरिकांची सुटका करण्याची मागणी त्यांनी केली. तसेच श्रीनगर लोकसभा सदस्य आगा सय्यद रुहुल्लाह मेहदी आणि माजी महापौर जुनैद अझीम मट्टू यांच्याविरुद्ध दाखल केलेले गुन्हे मागे घेण्याची मागणीही त्यांनी केली.

## परराष्ट्र मंत्रालयाचा नियंत्रण कक्ष स्थापन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम आशिया आणि आखाती प्रदेशात वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताचे परराष्ट्र मंत्रालय यांनी भारतीय नागरिकांच्या मदतीसाठी विशेष नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे.

प्रसिद्धीपत्रकानुसार हा नियंत्रण कक्ष दररोज सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत कार्यरत राहणार आहे. नागरिकांना १८०००११८७९७ (टोल फ्री), +९१ ११ २३०१ २११३, +९१ ११ २३०१ ४१०४ आणि +९१ ११ २३०१ ७९०५ या क्रमांकांवर संपर्क साधता येणार आहे. या निवेदनात संबंधित देशांतील भारतीय दूतावासांचे आपत्कालीन संपर्क क्रमांकही जाहीर करण्यात आले आहेत. बहरीन, इराण, इराक, इस्रायल, जॉर्डन, कुवेत, लेबनॉन, ओमान, कतार, रामल्ला (पॅलेस्टाईन), सौदी अरेबिया (रियाध व जेद्दा) आणि संयुक्त अरब अमिराती येथील दूतावासांशी थेट संपर्क साधण्यासाठी स्वतंत्र क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. पश्चिम आशियातील संघर्ष पाचव्या दिवशी पोहोचला असताना भारताने आपल्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी हे पाऊल उचलले आहे. दरम्यान, नागरी उड्डाण मंत्रालय यांनी जाहीर केले की अडकलेल्या प्रवाशांना परत आणण्यासाठी बुधवारी भारतीय विमान कंपन्यांकडून ५८ विशेष उड्डाणे तैनात केली जातील.

आतापर्यंत भारतीय विमान कंपन्यांची १,२२१ आणि परदेशी विमान कंपन्यांची ३८८ अशी एकूण १,६०९ उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. सोमवारी भारतीय विमान कंपन्यांनी २४ उड्डाणे चालवली, तर गेल्या २४ तासांत परदेशी विमान कंपन्यांनी आखाती प्रदेशातून नऊ उड्डाणे केली आहेत. ४ मार्च रोजी नियोजित ५८ उड्डाणांमध्ये इंडिगो यांच्या ३०, तर एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्सप्रेस यांच्या २३ उड्डाणांचा समावेश आहे.

## संघर्ष शमवण्याचे कॅनडाचे आवाहन

# आंतरराष्ट्रीय कायद्यांशी विसंगत हल्ले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**सिडनी :** कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांनी अमेरिका-इस्रायलने इराणवर केलेले हल्ले आंतरराष्ट्रीय कायद्यांशी विसंगत असल्याचे म्हटले असून, मध्यपूर्वेतील संघर्ष तातडीने कमी करण्याचे आवाहन केले आहे.



सिडनी येथे लोवी इन्स्टिट्यूट आयोजित कार्यक्रमात बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, कॅनडा इराणमधील सत्ताव्यवस्थेतील बदलांचे स्वागत करतो. त्यांच्या मते, इराणचे विद्यमान शासन मध्यपूर्वेतील अस्थिरता आणि दहशतीचे प्रमुख स्रोत ठरले आहे. तथापि, अमेरिका-इस्रायल कारवाईबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, प्रथमदर्शनी ही कारवाई आंतरराष्ट्रीय कायद्याशी सुसंगत असल्याचे दिसत नाही. मात्र, याबाबत अंतिम निर्णय संबंधित आंतरराष्ट्रीय संस्थांनी घ्यावा, असेही त्यांनी नमूद केले. "मी वकील नाही, आंतरराष्ट्रीय कायदेतज्ज्ञ तर नाहीच," असेही ते म्हणाले.

कार्नी यांचा हा दौरा ऑस्ट्रेलियातील अधिकृत भेटीचा भाग असून, तो आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील बहुदेशीय दौऱ्याचा घटक आहे. अमेरिकेवरील अवलंबित्व कमी करणे आणि समान विचारसरणीच्या 'मध्यम शक्ती' देशांशी संबंध दृढ करणे हा या दौऱ्याचा उद्देश असल्याचे सांगितले जाते.

यापूर्वी जागतिक आर्थिक मंचात केलेल्या भाषणात कार्नी यांनी अमेरिकेच्या नेतृत्वाखालील जागतिक व्यवस्थेवर टीका केली होती. तसेच अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी त्यांचे अनेकदा मतभेद झाले आहेत.

ट्रम्प यांनी कॅनडावर वाढीव शुल्क लादण्याबरोबरच कॅनडाच्या विलिनीकरणाबाबत केलेल्या वक्तव्यांमुळे दोन्ही देशांतील तणाव वाढला आहे.

बुधवारी कार्नी यांनी मध्यपूर्वेतील युद्ध हे आंतरराष्ट्रीय व्यवस्थेच्या अपयशाचे उदाहरण असल्याचे म्हटले. "कॅनडा शत्रुत्वाची तीव्रता कमी करण्याचे आवाहन करतो आणि या प्रक्रियेस हातभार लावण्यास तयार आहे," असे त्यांनी सांगितले. आंतरराष्ट्रीय कायदा सर्व संबंधित पक्षांवर बंधनकारक असल्याची पुनरुच्चारही त्यांनी केली.

दरम्यान, अमेरिका आणि इस्रायलने संयुक्त राष्ट्रांना सहभागी न करता तसेच कॅनडासह इतर मित्र राष्ट्रांशी सल्लामसलत न करता कारवाई केल्याचे कार्नी यांनी नमूद केले.

इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या हत्येनंतर इराणने मध्यपूर्वेत प्रत्युत्तरात्मक क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले वाढवले आहेत. लेबनॉनमध्ये इराणसमर्थक संघटना हिजबुल्लाह यांनीही इस्रायलवर ड्रोन आणि रॉकेट हल्ले केल्याचे वृत्त आहे.

## सुरक्षा वाढवण्यासाठी दोन मोठे संरक्षण करार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारताने आपली सागरी सुरक्षा आणि हवाई संरक्षण क्षमता मजबूत करण्यासाठी दोन प्रमुख संरक्षण करारांना मंजुरी दिली आहे. संरक्षण मंत्रालयाने मंगळवारी ५,०८३ कोटी रुपयांच्या करारांवर स्वाक्षरी केली, ज्यामध्ये भारतीय तटरक्षक दलासाठी सहा ॲडव्हान्स्ड लाइट हेलिकॉप्टर एमके-३ (सागरी भूमिका) खरेदी आणि भारतीय नौदलासाठी 'स्टिल' जमिनीवरून हवेत मारा करणारी उभ्या प्रक्षेपण क्षेपणास्त्र प्रणालीचा समावेश आहे. या करारांमुळे किनारी देखरेख क्षमता आणि युद्धनौकांच्या बहुस्तरीय हवाई संरक्षण प्रणालीला बळकटी मिळेल.

पहिला करार बेंगळुरू येथील हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेडसोबत ९०१ कोटी रुपयांचा करण्यात आला आहे. या हेलिकॉप्टरमध्ये अत्याधुनिक सागरी रडार, इलेक्ट्रो-ऑप्टिकल सेन्सर्स, आपत्कालीन फ्लोटेशन सिस्टम आणि शोध व बचाव उपकरणांचा समावेश आहे. 'ध्रुव' प्लॅटफॉर्मची अपग्रेड केलेली आवृत्ती असलेल्या या हेलिकॉप्टरची तैनाती किनारी देखरेख, प्रदूषण नियंत्रण, सागरी गस्त आणि ऑफशोअर इन्स्टॉलेशन्सच्या संरक्षणासाठी केली जाईल. प्रकल्पात २०० हून अधिक एमएसएमईंचा सहभाग असून अंदाजे ६.५ दशलक्ष मनुष्य-तास रोजगार निर्माण होण्याची शक्यता आहे.

दुसरा करार रशियाच्या जेएससी रोसोबोरोनेक्सपोर्टसोबत 'स्टिल' जमिनीवरून हवेत मारा करणारी उभ्या प्रक्षेपण क्षेपणास्त्र प्रणाली खरेदी करण्यासाठी करण्यात आला आहे.

ही प्रणाली भारतीय नौदलाच्या आघाडीच्या युद्धनौकांची हवाई संरक्षण क्षमता वाढवेल. तिचे उभ्या प्रक्षेपण तंत्रज्ञान ३६० अंश कव्हरेज प्रदान करते आणि लढाऊ विमाने, ड्रोन व जहाजविरोधी क्षेपणास्त्रांसह विविध हवाई धोक्यांपासून संरक्षण करण्यास सक्षम आहे.

संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांच्या उपस्थितीत साउथ ब्लॉकमधील मंत्रालयात या करारांवर स्वाक्षरी झाली. मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, या दोन्ही करारांमुळे भारतीय नौदल व तटरक्षक दलाची ऑपरेशनल तयारी वाढेल, तसेच हिंद महासागर क्षेत्रातील भारताची सागरी उपस्थिती आणि सुरक्षा संरचना अधिक मजबूत होईल.

## पारंपारिक उत्साहात होळी साजरी

**चंदीगड :** रंगांचा सण होळी बुधवारी पंजाब, हरियाणा आणि त्यांची सामान्य राजधानी चंदीगडमध्ये पारंपारिक उत्साहात साजरा करण्यात आला. लोकांनी एकमेकांवर गुलाल उधळला, पाण्याचे फुगे फेकले आणि मिठाईची देवाणघेवाण करून हा सण साजरा केला. जुळ्या राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील रहिवासी उत्सवात सहभागी झाल्यामुळे सर्व रंगांचे, गुलालाचा सुगंध रस्त्यांवर पसरला होता. लोकांनी शुभेच्छा दिल्या, नातेवाईकांना भेट दिली.

## खासदार रुहुल्लाह विरोधात गुन्हा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**श्रीनगर :** दिशाभूल करणारा ऑनलाइन मजकूर प्रसारित केल्याच्या आरोपावरून श्रीनगर पोलिसांनी सत्ताधारी नॅशनल कॉन्फरन्सचे खासदार आगा सय्यद रुहुल्लाह मेहदी आणि श्रीनगरचे माजी महापौर जुनैद अझीम मट्टू यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.

पोलिस प्रवक्त्याने दिलेल्या माहितीनुसार, डिजिटल आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर भीती निर्माण करणे, सार्वजनिक सुव्यवस्था बिघडवणे आणि बेकायदेशीर कारवायांना प्रोत्साहन देणे या उद्देशाने खोटा, बनावट व दिशाभूल करणारा मजकूर प्रसारित झाल्याची विश्वसनीय माहिती मिळाल्यानंतर कारवाई करण्यात आली. संबंधित मजकूर प्रथमदर्शनी विकृत कथन आणि अप्रमाणित माहितीचा प्रसार करत असल्याचे दिसून येत असून त्यामुळे सामाजिक असंतोष आणि सार्वजनिक अशांतता निर्माण होऊ शकते, असे पोलिसांनी म्हटले आहे. या प्रकरणी श्रीनगर येथील सायबर पोलिस ठाण्यात विविध कलमांखाली गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

दरम्यान, पोलिसांनी नागरिकांना सोशल मीडियावर कोणतीही माहिती शेअर करण्यापूर्वी अधिकृत आणि विश्वासार्ह स्रोतांकडून पडताळणी करण्याचे आवाहन केले आहे.

जातीय सलोखा किंवा सार्वजनिक सुव्यवस्थेला बाधा पोहोचवू शकणारी असत्यापित सामग्री प्रसारित करू नये, असा इशाराही देण्यात आला आहे.


## अमेरिका-इस्रायल-इराण संघर्ष चौथ्या दिवशी

# अमेरिकेच्या क्षेपणास्त्र साठ्यावर वाढता ताण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वॉशिंग्टन :** अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेला तीव्र लष्करी संघर्ष चौथ्या दिवशी पोहोचला असून परिस्थिती अधिकच चिघळत आहे. पेंटागॉनकडून समोर आलेल्या माहितीनुसार, पुढील दहा दिवस इराणवर सातत्याने हल्ले सुरू राहिल्यास अमेरिकेच्या महत्त्वाच्या क्षेपणास्त्र साठ्यात मोठी घट होऊ शकते.

हल्ल्याची ठिणगी शुक्रवारी दुपारी पडली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबत सुरू असलेल्या अणु चर्चेबाबत नाराजी व्यक्त केल्यानंतर अवघ्या तीन तासांत



व्यापक लष्करी कारवाईचे आदेश दिले. अमेरिकेच्या या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी आणि अनेक वरिष्ठ लष्करी कमांडर ठार झाल्याचा दावा करण्यात आला. प्रत्युत्तरादाखल इराणने बहरीन, सौदी अरेबिया, कतार, संयुक्त अरब अमिराती आणि इराकमधील अमेरिकन लष्करी तळांवर क्षेपणास्त्रे आणि ड्रोन हल्ले चढवले.

अल जझीराच्या वृत्तानुसार, पेंटागॉनने राष्ट्राध्यक्षांना कळवले आहे की युद्ध लांबल्यास दारूगोळा साठा पुनर्भरणासाठी मोठा आर्थिक बोजा सहन करावा लागू शकतो. २३ फेब्रुवारी रोजी द वॉल स्ट्रीट जर्नलने दिलेल्या वृत्तानुसार, जॉइंट चीफ्स ऑफ स्टाफचे अध्यक्ष जनरल डॅन केन यांनीही इस्रायल आणि युक्रेनला दिल्या जाणाऱ्या लष्करी मदतीमुळे अमेरिकेच्या अत्याधुनिक शस्त्रसाठ्यावर ताण वाढल्याचा इशारा दिला आहे. तज्ज्ञांच्या मते, अमेरिकेची क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली ही रशिया किंवा चीनसारख्या महासत्तांकडून होणाऱ्या मर्यादित पण तीव्र हल्ल्यांना तोंड देण्यासाठी डिझाइन करण्यात आली होती; इराणसारख्या वारंवार आणि तुलनेने कमी खर्चाच्या रॉकेट हल्ल्यांना रोखण्यासाठी ती पुरेशी सक्षम नाही.

या पार्श्वभूमीवर राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवरील पोस्टमध्ये अमेरिकेकडे जवळपास अमर्याद शस्त्रसाठा असल्याचा दावा केला. या शस्त्रांच्या बळावर युद्ध दीर्घकाळ यशस्वीरित्या लढता येईल, असे त्यांनी नमूद केले. इराणवरील कारवाई चार ते पाच आठवड्यांसाठी नियोजित असल्याचेही त्यांनी सांगितले; मात्र परिस्थितीनुसार कालावधी वाढू शकतो, असे संकेत दिले.

दरम्यान, अल जझीराच्या अहवालात अमेरिकेकडे अचूक मार्गदर्शित शस्त्रसामग्री आणि महत्त्वाच्या इंटरसेप्टर्सची कमतरता भासत असल्याचा इशारा देण्यात आला आहे. गेल्या वर्षी इराणसोबतच्या संघर्षात अमेरिकेने त्यांच्या सुमारे २५ टक्के टीएचएडी इंटरसेप्टर्सचा वापर केल्याचे नमूद करण्यात आले आहे. जहाजांवर तैनात इंटरसेप्टर्सचाही मोठा वापर झाला. पारंपरिक बॉम्बना अचूक स्मार्ट शस्त्रांमध्ये रूपांतरित करणाऱ्या जेडीएएम किट्सचा साठाही घटल्याचे वृत्त आहे.

अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी सोमवारी महत्त्वाची आकडेवारी जाहीर करताना सांगितले की इराण दरमहा सुमारे १०० क्षेपणास्त्रे तयार करत आहे, तर अमेरिका दरमहा केवळ सहा ते सात इंटरसेप्टर्स तयार करू शकते. हल्ल्यांच्या पहिल्या २४ तासांतच सुमारे ७७९ दशलक्ष डॉलर्स खर्च झाल्याचा अंदाज आहे.